बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक

2026-27

क्र. साप्रवि/एफजीआर/08 दि.20.11.2026

विषय- महानगरपालिका कर्मचारी तसेच निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांच्या महागाई भत्त्याच्या / महागाई सहाय्याच्या दरात वाढ करण्याबाबत.

संदर्भ – १) परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/01 दि.21.05.2026

२) केंद्र शासन निर्णय क्र. 1/2(i)/2026-E.II (B) दि.29th October, 2026

उपरोक्त संदर्भ क्र. २ वरील केंद्र शासन निर्णयाप्रमाणे दि.01 जुलै 2026 पासून महागाई भत्त्याचा /महागाई सहाय्याचा दर 60% वरून 63% प्रमाणे सुधारित करण्यात आला आहे. त्यानुसार महानगरपालिका कर्मचा-यांना सध्या आकारण्यात येत असलेल्या महागाई भत्त्याच्या / महागाई सहाय्याच्या दरात दि.01 जुलै 2026 च्या प्रभावाने 60% वरून 63% अशी वाढ करण्यात येत आहे. सदर महागाई भत्ता / महागाई सहाय्य हे महानगरपालिका समय वेतनश्रेणीतील पूर्णकालिक कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक, वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवर्गातील कर्मचारी, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीत वेतन घेणारे अध्यापकीय कर्मचारी यांना अनुज्ञेय असून माध्यमिक शाळा संहितेनुसार वेतन अनुज्ञेय असणा-या माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना अनुज्ञेय असणार नाही.

सुधारित महागाई भत्त्याची / महागाई सहाय्याची माहे नोव्हेंबर 2026 या महिन्यासाठीची आकारणी, जुलै 2026 ते ऑक्टोबर 2026 या महिन्यांच्या थकबाकीसह, संबंधित कर्मचा-यांच्या/ निवृत्तीवेतनधारकांच्या / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या माहे नोव्हेंबर 2026 च्या मासिक वेतनपत्रकात / निवृत्तीवेतनात / कुटुंब निवृत्तीवेतनात करण्याबाबतची कार्यवाही मानव संसाधन विभागामार्फत करण्यात येईल.

टिप- १ :- महागाई भत्त्याची /महागाई सहाय्याची रक्कम परिगणित करताना सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन विचारात घ्यावे. विशेष भत्ता किंवा इतर कोणत्याही नावाने वेतनात समाविष्ट होणारी रक्कम विचारात घेऊ नये.

टिप- २ :- महागाई भत्त्याची /महागाई सहाय्याची रक्कम परिगणित करताना 50 पैसे किंवा त्याहून अधिक येणारी रक्कम पुढील रुपयात पूर्णांकित करावी व 50 पैशापेक्षा कमी येणारी रक्कम दुर्लक्षित करावी.

टिप -३ :- ज्यांना 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' (DC-1) लागू आहे अशा कर्मचा-यांची परिपत्रक क्र. प्रले/को/एफपीपी/18 दि.09.09.2010 नुसारची वसुली सदर थकबाकीतून करणे आवश्यक आहे.

टिप- ४ :- या अनुषंगाने होणारा खर्च संबंधित आस्थापनांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

सर्व खाते प्रमुख आणि सहाय्यक आयुक्त यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील आस्थापना कर्मचा-यांना वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यास सूचित करावे.

सदर परिपत्रकाची प्रत बृहन्मुंबई महापालिकेच्या Intranet वर http://mybmcemp.gov.in या संकेतस्थळावर Circular/HR Circulars/GAD/Dy.C.A.Estt./FGR येथे उपलब्ध आहे.

सही/- दि.06.11.2026 श्रीम. रोहिणी खानोलकर उप प्रमुख लेखापाल (आस्था-2)	सही/- दि.06.11.2026 श्री. मोतीराम वाजे प्रमुख लेखापाल (कोषागार) प्र.	सही/- दि.13.11.2026 श्री. अरुण जाधव प्रमुख लेखापाल (वित्त)
सही/- दि.13.11.2026 श्री. किशोर गांधी मा. उप आयुक्त (सा.प्र.)	सही/- दि.17.11.2026 श्री. देविदास क्षीरसागर मा. सह आयुक्त (वित्त)	सही/- दि.18.11.2026 श्रीम. प्राजक्ता वर्मा मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)
सही/- दि.18.11.2026 श्री. अभिजित बांगर अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)	सही/- दि.19.11.2026 श्रीम. अश्विनी भिडे महानगरपालिका आयुक्त	

परिपत्रक

2026-27

क्र.साप्रवि/एफजीआर/08 दि.20.11.2026

प्रत _____ यांना (____ ज्यादा प्रतींसह) माहितीकरिता आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

20/11/26

उप प्रमुख लेखापाल (आस्था-२)